# विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, कोकण विभाग, यांचे कार्यालय

**कोकण भवन, 3 रा मजला, रुम नं. 308, 310, नवी मुंबई- 400 614.**

दुरध्वनी क्र. 27571395 djr_kkn@rediffmail.com / djrkkn@gmail.com फॅक्स क्र. 27571396


| जा.क्र. विसनि/कोकण/वि.7/का.क.88/संतजोजेफक्रे.सो./08 /2017 | दिनांक :-12/12/ 2017 |
|---|---|

## महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम ८८ अन्वये आदेश

**वाचावे :** १. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६०चे कलम ८८ मधील तरतूद

२. जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था ठाणे यांचेकडील क्र.जिउनि/ठाणे/बी-७/का.क.८३(१) पतसंस्था/संतजोसेफ/११७८८/सन२०१६ दि.०७/०१/२०१६ रोजीचा आदेश

३. श्री.एस.एस.भंडारे, चौकशी अधिकारी तथा विशेष लेखापरीक्षक वर्ग-२ सहकारी संस्था (ग्राहक)ठाणे यांनी दि.२१/०७/२०१६ रोजी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था ठाणे यांना सादर केलेला अहवाल.

४. जिल्हा उपनिबंधक,सहकारी संस्था पालघर यांचेकडील क्र.जिउनि/पालघर/काक८८/ संतजोसेफ क्रे/२०२/२०१७ दि.०३/०३/२०१७ रोजीचा ८८चा आदेश.

५.या कार्यालयाकडील क्र.विसनि/कोंकण/वि-५/पोटनिदु/संतजोजेफ/को.ऑ.क्रे.सोसा/मंजूर/२१ / २०१७ दि.०८/१२/२०१७ चे ज्ञापन.

ज्याअर्थी,संत जोजेफ को.ऑप.क्रेडिट सोसायटी लि.कृपा अपार्टमेंट तारभाट, सागरशेत रोड,पोस्ट पापडी, ता. वसई जि.पालघर ही संस्था महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ मधील तरतुदीनुसार नोंदणीकृत संस्था असुन संस्थेचा नोंदणी क्रमांक टीएनए (व्ही.एस.आय.) आर.एस.आर (सी.आर) /४२३/१९८६-८७,दि.२३/०७/१९८६ असा आहे. आणि,

ज्याअर्थी,सदरील नोंदणीकृत पतसंस्था वाचावे क्र.५ च्या पोटनियम दुरुस्ती अन्वये या कार्यालयाच्या अधिकारक्षेत्रात येत आहे. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ तसेच पतसंस्थेने स्विकारलेले आदर्श उपविधी त्याप्रमाणे शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके यास अधिन राहून संस्थेचे कामकाज करण्याची सर्वस्वी जबाबदारी व कर्तव्य हे संस्थेच्या संचालक मंडळ(पदाधिकारी) यांचे आहे.आणि,

ज्याअर्थी संस्थेच्या कामकाजासंदर्भात प्राप्त तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,ठाणे यांचे कार्यालयाकडील वाचावे क्र.२ अन्वये चौकशीचे आदेश पारीत झालेले होते. त्यानुसार संबंधित चौकशी अधिकारी यांनी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था ठाणे यांना दि.२१/०७/२०१६ रोजी चौकशी अहवाल सादर केलेला आहे. आणि,

ज्याअर्थी कलम ८३ अन्वये प्राप्त चौकशी अहवालातील आर्थिकदृष्टया गंभीर बाबीचे अनुषंगाने कलम ८८ अन्वये कार्यवाही करणे आवश्यक आहे.आणि,

ज्याअर्थी उपरोक्त अहवालात चौकशी अधिकारी यांनी निदर्शनास आणून दिलेल्या बाबींच्या अनुषंगाने संस्थेचे आर्थिक नुकसान झालेले असून व संचालक मंडळाने घेतलेल्या निर्णयाने संस्था आणि सभासदांच्या आर्थिक हितास बाधा पोहोचलेली असून,संस्थेच्या निर्णय प्रक्रियेत ज्यांचा प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष सहभाग आहे त्यांचेकडून महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ तसेच संस्थेने स्विकारलेल्या आदर्श उपविधीतील तरतुदींचे उल्लंघन झाल्याने सदर पतसंस्थेचे आर्थिक नुकसान झालेले

आहे.सदर नुकसान व गैरव्यवहारास संस्थेचे संचालक मंडळ,व्यवस्थापक अथवा संस्थेचे संबंधीत कर्मचारी यांचे विरुध्द आर्थिक नुकसानीची जबाबदारी निश्चित करणेकरीता तथा नुकसानीची रक्कम वसुल करण्याकरीता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ (सुधारित अधिनियम २०१३) चे कलम ८८ अन्वये चौकशीचे आदेश वाचावे क्र.४ अन्वये जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था पालघर यांचेकडून पारित करणेत आलेले आहे.तथापि वाचावे क्र.५ अन्वये पोटनियम दुरुस्ती करुन संस्थेचे कार्यक्षेत्र विभागस्तरीय झालेले आहे. आणि,

ज्याअर्थी विषयांकित संस्थेच्या महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये प्राप्त चौकशी अहवालातील निष्कर्षावरुन प्रस्तुत प्रकरणी संस्थेच्या पैशांचे/मालमत्तेचे अपयोजन/अपकार्य/ विश्वासघात या कृतीकरीता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये चौकशी होणे आवश्यक आहे असे माझे मत झाले आहे.

त्याअर्थी कलम ८८ च्या चौकशीचे वाचावे क्र.४ चे आदेश बदलून फेरआदेश पारीत करण्याबाबत माझी खात्री झालेली असल्यामुळे खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ (सुधारित अधिनियम २०१३) अन्वये मला प्राप्त अधिकारानुसार मी ज्योती लाठकर,विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था कोंकण विभाग,नवी मुंबई, संत जोजेफ को.ऑप.क्रेडिट सोसायटी लि.कृपा अपार्टमेंट तारभाट, सागरशेत रोड,पोस्ट पापडी, ता. वसई जि.पालघर या पतसंस्थेच्या सोबतच्या परिशिष्टात नमुद केलेल्या रकमेच्या आर्थिक नुकसानीची, जबाबदारी निश्चितीसाठी संस्थेचे संचालक मंडळ,व्यवस्थापक व कर्मचारी यांच्या नुकसानीतील सहभागानुसार भरपाईसाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये चौकशी फेरआदेशीत करीत आहे.सदर चौकशी करण्यासाठी श्री. सुरेश अंधारे,सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,पालघर यांना चौकशी अधिकारी म्हणून प्राधिकृत करीत आहे. चौकशी अधिकारी यांनी आदेशाचे दिनांकापासून जास्तीत जास्त सहा महीनेचे आंत आवश्यक ती चौकशी करुन अहवाल सादर करावा.

(ज्योती लाठकर)
**विभागीय सहनिबंधक**
**सहकारी संस्था, कोकण विभाग, नवी मुंबई**

**प्रति,**

१) श्री. सुरेश अंधारे,सहाय्यक निबंधक सहकारी संस्था,पालघर तथा प्राधिकृत अधिकारी, संत जोजेफ को.ऑप. क्रेडिट सोसायटी लि.कृपा अपार्टमेंट तारभाट, सागरशेत रोड,पोस्ट पापडी,ता.वसई जि.पालघर

२) व्यवस्थापक, संत जोजेफ को.ऑप.क्रेडिट सोसायटी लि.कृपा अपार्टमेंट तारभाट, सागरशेत रोड,पोस्ट पापडी, ता. वसई जि.पालघर

यांना कळविणेत येते की, त्यांनी का.क. ८८ अंतर्गत चौकशीकामी आवश्यक ती कागदपत्रे चौकशी अधिकारी यांना उपलब्ध करुन दयावी.

**प्रत माहितीसाठी :-**

१) जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था,पालघर
२) उपनिबंधक सहकारी संस्था,वसई
३) जिल्हा विशेष लेखापरीक्षक सहकारी संस्था,पालघर

**विभागीय सहनिबंधक**
**सहकारी संस्था, कोकण विभाग, नवी मुंबई**

# परिशिष्ट

## संत जोजेफ को.ऑप.क्रेडिट सोसायटी लि.कृपा अपार्टमेंट,सागरशेत,वसई,ता.जि.पालघर

आदेश जा.क्र.विसनि/वि-७/का.क.८८/संत जोजेफ क्रे./08 /२०१७ दिनांक :12/१२/२०१७

| अ.क्र. | ८३ च्या चौकशी अहवालातील मुद्दा क्र. | चौकशीचे मुद्दे |
|---|---|---|
| १ | ०२ | १. कॅश क्रेडिट कर्ज,मेसर्स थ्री एस.एफ.ऑटो :<br><br>संस्थेच्या दिनांक १३/०४/२०१६ अखेर रु.१,२३,५४,१३५/- व व्याज रु. ६६,७५,४१८/- एकूण रु.१,९०,२९,५५३/- झालेल्या आर्थिक नुकसानीस कारणीभूत असणारे संस्थेचे संचालक सदस्य,पदाधिकारी,अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करणे. |

12/12

विभागीय सहनिबंधक
सहकारी संस्था, कोकण विभाग, नवी मुंबई

मुं.नि. का.(७) ६